मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# नागरिकांच्या अपेक्षांची पूर्तता हाच संकल्प!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची भावना : कृष्णानगर येथील मंदिरांच्या प्रस्तावित कामांचे भूमिपूजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभा मतदार संघासह पिंपरी-चिंचवडमधील शेवटच्या घटकांतील नागरिकांच्या अपेक्षांची पूर्तता करणे आणि विकसित शहर घडवण्याचा संकल्प आम्ही केला आहे, अशी भावना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केली.

भोसरी विधानसभा मतदार संघातील कृष्णानगर येथे रायरेश्वर प्रतिष्ठाणच्या माध्यमातून श्री. रायरेश्वर मंदिरासाठी सभा मंडपाच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी आमदार लांडगे बोलत होते. यावेळी कृष्णानगर येथील श्रीकृष्ण मंदिराच्या जिर्णोद्धाराच्या कामाचेही भूमिपूजन करण्यात आले. परिसरातील स्थानिक नागरिक व भाविकांकडून याबाबत अनेकदा मागणी करण्यात आली होती.



भूमिपूजन कार्यक्रमासाठी यावेळी सामाजिक कार्यकर्ते निलेश नेवाळे, प्रतिष्ठाणचे अध्यक्ष संभाजी खैरे, श्री विठ्ठल- रुक्मिणी मंदिर प्रतिष्ठाण, श्रीमंत छत्रपती शिवाजी पार्कचे सर्व सभासद उपस्थित होते. यावेळी माजी नगरसेवक सुरेश म्हेत्रे, माजी नगरसेविका योगीता नागरगोजे, सामाजिक कार्यकर्ते निलेश बोराटे, नितीन बोऱ्हाडे, मंगेश हिंगणे, निखील बोऱ्हाडे, अतूल बोराटे, निलेश तळेकर आदी उपस्थित होते.

आमदार लांडगे म्हणाले की, भोसरी विधानसभा मतदार संघातील प्रभागनिहाय प्रलंबित विकासकामे निवडणूक आचारसंहितामुळे रखडली होती. “परिवर्तन हेल्पलाईन- 93 79 90 90 90” च्या माध्यमातून नागरी समस्या आणि पावसाळा पूर्व कामे, आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात सोसायटीधारकांच्या समस्या, अशी कामे मार्गी लावली जात आहेत.

### गंधर्व एक्सलन्स् सोसायटीच्या सीमा भिंतीचा प्रश्न मार्गी...

» भोसरी विधानसभा मतदार संघातील गंधर्व एक्सलन्स् सोसायटी, मोशी येथील सीमाभिंत कामाचे भूमिपूजन करण्यात आले. या सोसायटीमध्ये सुमारे ३ हजार नागरिक वास्तव्यास आहेत. रहिवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सदर सीमा भिंतीचे काम मार्गी लावावे, अशी मागणी होती. त्यानुसार आज कामाला सुरूवात करण्यात आली. तसेच, गंधर्व एक्सलन्स् ते मंत्रा मुव्हमेंट पर्यंतचा रस्ता अपूर्णावस्थेत आहे. तो मार्गी लावावा. या करिता रहिवाशांनी सूचवले होते. सदर रस्त्याचे काम आगामी आठवडाभरात सुरू करु, असे आश्वासन आमदार लांडगे यांनी दिले. त्यामुळे रहिवाशांनी समाधान व्यक्त केले आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते निलेश बोराटे, माजी नगरसेविका अश्विनी जाधव, सारिका बोऱ्हाडे, जालिंदरनाथ जाधव, जयश्री, मोरे, ललीता मजगे, नितू सिंग, सविता काटकर, अश्विनी कुंभार, संतोष माळी, भिकन दुसाने, मनोज वाघ, अंकुश घोंगे, ज्ञानेश्वर साळवे, जगदीश पाटील, निसर्ग पारधी, प्रकाश मोरे, निलेश कोतवाल यांच्यासह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# पिंपरी-चिंचवड शहरातील रस्त्यांची चाळण, अपघाताचा धोका वाढला

## केबल, गॅस पाईपलाईनच्या कामासाठी रस्त्यावर खोदाई, खड्डे व्यवस्थित बुजवण्याकडे दुर्लक्ष

**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या तीन ते चार दिवसांपासून सुरू असलेल्या पावसात पिंपरी-चिंचवडमधील रस्त्यांची चाळण झाली आहे. रस्त्यावरील खडी वाहून गेली असून ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. पावसाचे पाणी साचून राहत असल्यामुळे वाहने त्यामध्ये आदळून अपघात होण्याचे धोके निर्माण झाले आहेत.

शहरात विविध विकासकामे सुरू आहेत. त्याबरोबरच केबल, गॅस पाईपलाईनच्या कामासाठी रस्त्यावर खोदाई करण्यात येत आहे. त्यासाठी चांगला डांबरी रस्ता, सिमेंटचे रस्ते देखील खोदण्यात आले आहेत. मात्र, काम झाल्यानंतर ते खड्डे व्यवस्थित बुजवण्याकडे दुर्लक्ष होत आहे. केवळ माती टाकून हे खड्डे बुजवले जात आहेत. काही ठिकाणी बारीक खडी टाकली आहे. जूनचा पहिला आठवड्यातच मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे खड्डे बुजवण्यात आलेली माती, खडी वाहून गेली आहे. त्यामुळे, पुन्हा अर्धा ते एक फूट खड्डे तयार झाले आहेत. यात पावसाचे पाणी साचत आहेत. त्यामध्ये वाहने मोठ्या प्रमाणात आदळून अपघात होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

शहरातील भोसरी, मोशी, चिंचवड, निगडी, रहाटणी, अजमेरा, संत तुकारामनगर, मासुळकर कॉलनीमध्ये ही परिस्थिती आहे. विविध कारणाने खोदाई केली आहे. त्याने वाहनाचा वेग मंदावला असून वाहतूक कोंडीचा सामना वाहनचालकांना करावा लागतो. पालिका प्रशासनाच्या बेजबाबदार कारभारावर नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.



> “ शहरात खड्डे पडले आहेत. खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साठत आहे. कामावरुन जाताना खड्ड्याचा अंदाज येत नाही. त्यामुळे, वाहने आदळत आहेत. ज्याठिकाणी अशी परिस्थिती आहे. तेथील खड्डे त्वरित बुजवले पाहिजेत.
>
> \- धीरज पाटील, नोकरदार

> “ रस्त्यात ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. पावसामुळे त्याचा अंदाज येत नाही. अनेकदा एमआयडीसीमधून भोसरीला रात्री घरी जावे लागत आहे. अशावेळी खड्ड्याचा अंदाज न आल्याने पडू की काय ? अशी भीती वाटते.
>
> \- सागर सोनवणे, कामगार

# मुरलीधर मोहोळ यांना मंत्रिपदाची लॉटरी

## पहिल्याच टर्ममध्ये ‘मुरलीधर मोहोळ’ यांच्या गळ्यात मंत्रिपदाची माळ; मोदी मंत्रिमंडळात वर्णी

**पुणे | प्रतिनिधी**

NDA संसदीय पक्षाचे नेते नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली आहे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नरेंद्र मोदींना सरकार स्थापनेचे निमंत्रण दिले होते. त्यानंतर आज नरेंद्र मोदींचा शपथविधी पार पडला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं आगमन झालं असून, यावेळी राष्ट्रपती भवनात जल्लोष पाहायला मिळाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, राजनाथ सिंह यांच्यानंतर अमित शाह यांनी शपथ घेतली. तसेच नितीन गडकरीही मोदींच्या मंत्रिमंडळात असून त्यांनी देखील मंत्रिपदाची घेतली शपथ घेतली.

डॉ. एस जयशंकर यांनीही केंद्रीय मंत्रीपदाची शपथ घेतली. जयशंकर यांनी या आधी परराष्ट्र मंत्री म्हणून काम पाहिलं आहे. निर्मला सीतारामण यांना दुसऱ्यांदा मोदींच्या मंत्रिमंडळात मंत्रिपदाची संधी मिळाली आहे. यामध्ये पहिल्यांदाच पुण्याचे खासदार झालेल्या मुरलीधर मोहोळ यांचाही समावेश असून, त्यांनी देखील मंत्रिपदाची शपथ घेतली आहे.



### नगरसेवक, महापौर ते केंद्रात मंत्रीपद मोहोळ यांचा राजकीय प्रवास

» मुरलीधर मोहोळ प्रथमच पुण्यातून खासदार झाले आहेत. त्यानंतर त्यांना थेट मंत्रीपद मिळाले आहे. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत मुरलीधर मोहोळ यांनी काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांचा पराभव केला होता. पुणे लोकसभा मतदारसंघातून तब्बल १ लाख २३ हजारांच्या मताधिक्याने मोहोळ निवडून आले. आता मोहोळ यांची नगरसेवक, महापौर ते केंद्रात मंत्रीपद अशी कारकीर्द राहणार आहे.

संपूर्ण राज्याचं लक्ष लागून राहिलेल्या पुणे लोकसभा मतदारसंघात काँग्रेसचे आमदार रविंद्र धंगेकर यांचा पराभव करून मुरलीधर मोहोळ पहिल्यांदाच पुण्यातून खासदार झाले आहेत. राज्यभरात भाजपला अपेक्षित यश मिळालं नसताना मुरलीधर मोहोळ यांनी मात्र पुणे मतदारसंघात विजय मिळवला.

### मुरलीधर मोहोळ यांना पंतप्रधान कार्यालयातून फोन

» पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांना पंतप्रधान कार्यालयातून फोन आला आहे. त्यांचा केंद्रीय मंत्रीमंडळात समावेश होणार आहे. महापौर ते केंद्रात मंत्रीपद अशी त्यांची कारकीर्द असणार आहे. पंतप्रधान कार्यालयातून आज सकाळी मोहोळ यांना संपर्क साधण्यात आला आणि त्यांना मंत्रिमंडळात स्थान देण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती समोर आली आहे.

त्यांनंतर आता थेट केंद्रीय मंत्रिमंडळात त्यांची वर्णी लागली आहे. मुरलीधर मोहोळ यांनी काँग्रेसचे रविंद्र धंगेकर यांचा १२३०३८ मतांनी पराभव केला. मुरलीधर मोहोळ यांना ५८४७२८ तर रविंद्र धंगेकर यांना ४६१६९० मतं मिळाली. वंचितकडून निवडणूक लढवणारे वसंत मोरे ३२०१२ मतं मिळवून तिसऱ्या स्थानी राहिले.

मुरलीधर मोहोळ यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक म्हणून काम केलं. भाजपमध्ये त्यांनी बूथ प्रमुख म्हणून कामाला सुरुवात केली. नंतरच्या काळात भाजप युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष आणि सचिव म्हणूनही त्यांनी काम पाहिलं.

मोहोळ हे गेल्या ३० वर्षांपासून संघटनेत कार्यरत आहेत. पुण्याचे महापौर म्हणून त्यांनी काम केलं. पश्चिम महाराष्ट्रात भाजप पक्ष वाढवण्यासाठी आणि मराठा समाजातील नेत्याला संधी देण्याच्या भूमिकेतून भाजपने मोहोळ यांना केंद्रात घेतलं असल्याचं म्हटलं जात आहे.

पुणेकरांमध्ये आनंदाचे वातावरण असून, कोथरूड येथील मुरलीधर मोहोळ यांच्या कार्यालयासमोर भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी गर्दी करत आनंदोत्सव साजरा करत आहे.

# महापालिकेकडूनच शहरात अनधिकृत खोदाई

## स्वामी विवेकानंद शाळा ते राजारामपूल चौकापर्यंत सुमारे दीडशे ते दोनशे मीटरचा रस्ता खोदण्यात आला

**पुणे | प्रतिनिधी**

पावसाळा सुरू झाल्याने शहरात केवळ तातडीच्या व अत्यावश्यक कामांसाठीच रस्ते खोदाई करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. हे काम करतानाही पथ विभागाला कल्पना देऊनच काम करण्याचे आदेश आहेत. तरीही, सिंहगड रस्त्यावर महापालिकेच्या प्रकल्प विभागाने उड्डाणपुलाचे काम करणाऱ्या ठेकेदारास परस्परच खोदाईस परवानगी दिली असल्याचे समोर आले आहे.

हा प्रकार समोर आल्यानंतर पथ विभागाने तातडीने प्रकल्प विभागास हे काम थांबवण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे शहरातील रस्ते खोदाईबाबत महापालिकेतच समन्वय नसल्याचे चित्र आहे. उड्डाणपुलाच्या कामामुळे या रस्त्यावर आधीच सातत्याने वाहतूक कोंडी होत असताना, या खोदाईने कोंडीत आणखीनच भर पडलेली आहे.



महापालिकेकडून शहरात ३० एप्रिलपासून रस्ते खोदाईस मनाई केली आहे. तर पावसाळ्यात तातडीची बाब उद्भवल्यास महावितरण, ड्रेनेज तसेच पाणीपुरवठा विभागालाच रस्ते खोदाईस मुभा दिली आहे.हे काम करताना पथ विभागाला पूर्वकल्पना देणे तसेच त्यांची मान्यता घेणे बंधनकारक आहे. मात्र, असे असतानाही उड्डाणपुलाच्या सेवा वाहिन्यांचे कारण देत प्रकल्प विभागाच्या मान्यतेने सिंहगड रस्त्यावर स्वामी विवेकानंद शाळा ते राजारामपूल चौकापर्यंत सुमारे दीडशे ते दोनशे मीटरचा रस्ता खोदण्यात आला आहे.

### महावितरण, एमएनजीएलच्या वाहिनीला धोका

» ज्या ठिकाणी या सेवा वाहिन्यांसाठी खोदाई करण्यात येत आहे. त्याच जागेवर जमिनीखाली महावितरण तसेच एमएनजीएलच्या उच्च दाब क्षमतेच्या मोठ्या केबल टाकण्यात आलेल्या आहेत. भविष्यात त्या वाहिन्यांमध्ये काही अडचणी आल्यास या पुलासाठीच्या सेवा वाहिन्यांचे नुकसान होणार आहे, त्यामुळे हे काम नक्की कशाचे आहे, याबाबत शंका उपस्थित केल्या जात आहेत.

या सेवा वाहिन्या उड्डाणपुलाच्या असतील, तर पुलाचे काम सुरू होण्यापूर्वीच ही खोदाई होणे आवश्यक होते. मात्र, पुलाचे काम ९० टक्के पूर्ण झाल्यानंतर आता सेवावाहिन्यांचे स्थलांतरण करण्याचे कारण देत रस्ता खोदण्यात आला आहे.

तर, या कामासाठीचा जेसीबी तसेच राडारोडा भरण्याचा ट्रक रस्त्यावरच लावला जात असल्याने वाहनांसाठी केवळ एकच लेन रस्ता मिळत असून प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे.

# मावळ तालुक्यातील रस्त्यांची वाट बिकट

## मावळ तालुक्यातील अनेक रस्त्यांची पावसाळ्यात वाट कशी काढणार, ठिकठिकाणी खोदकाम, अर्धवट रस्ते

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील अनेक रस्त्यांची वाट बिकट झालेली असून ठिकठिकाणी खोदकाम, अर्धवट रस्ते केलेले असल्याने या पावसाळ्यातही ग्रामस्थांना चिखल तुडवावा लागणार आहे. दमदार पावसाला सुरवात होण्यापूर्वी गावांतील रस्त्यांची दुरुस्ती, डागडुजी करण्याची मागणी ग्रामस्थ करत आहेत.

मावळ तालुक्यातील अनेक गावांमध्ये अद्यापही चांगले रस्ते नाहीत. अनेक ठिकाणी माती, खडी, मुरूम टाकलेले रस्ते आहेत. त्यातूनच ग्रामस्थांना वाट काढावी लागते. पावसाळ्यात या रस्त्यांवर चिखल, राडारोडा पसरतो. परिणामी वाहने घसरण्याचे प्रकार घडतात. तर, अनेकदा गंभीर अपघाताची शक्यताही नाकारता येत नाही. त्यामुळे तालुक्यातील गावांमधील रस्त्यांची डागडुजी, दुरुस्ती करण्याची गरज आहे.

मागील दोन ते तीन महिन्यांपासून रस्ता रूंदीकरणाच्या कामासाठी मळवली ते पाटण रस्त्याच्या कडेने जागोजागी खोदकाम केले आहे. त्यामुळे नागरिकांची अडचण झालेली असतानाच आता ऐन पावसाळ्याच्या तोंडावर रस्त्याच्या दुसऱ्या बाजूलाही नवीन पाइपलाइनच्या कामासाठी रस्त्यावर खोदकाम करण्यात आले आहे.

या खोदकामाचा राडारोडा रस्त्यावर पडला असून वाहन चालकांसह नागरिकांची तारांबळ उडाली आहे. दोन दिवसांपूर्वी झालेल्या मान्सूनपूर्व पावसामुळे या रस्त्यावर पाणी साठून डबकी तयार झाली आहे. सहा महिन्यांपूर्वीच पाइपलाइनचे काम पूर्ण करणे आवश्यक होते. मात्र, ऐन पावसाच्या तोंडावर रस्ता दुरूस्ती व पाइपलाइनचे काम सुरू केल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

रस्त्यावर येणारे -जाणारे प्रवासी, व्यावसायिक, शेतकरी, दुध व्यवसाय, विद्यार्थी यांना या खड्डेमय रस्त्यामुळे ये-जा करणे अवघड झाले आहे. हा रस्ता कामशेत ते जांभवली या रस्त्याला जोडणारा रस्ता आहे. रस्त्यात खड्डे असल्याने वाहने घसरण्याची शक्यता आहे. प्रशासनाने अपूर्ण रस्ता व अतिक्रमण काढून पूर्ण रस्ताची पाहणी करून रस्ते करावेत. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअतर्गत अपूर्ण रस्त्याची काम तात्काळ सुरू करावे, अशी मागणी नागरिक करीत आहेत.



### काम्ब्रे ते कोंडीवडे रस्ताच अपूर्ण

» काम्ब्रे ते कोंडीवडे ना. मा. येथील मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत असलेला रस्ता अपूर्ण असून त्याचीही दुरवस्था झाली आहे. ६ मार्च २०२० मध्ये पूर्ण होणे अपेक्षीत होते. तर, २०२५ पर्यंत देखभाल दुरुस्तीसाठी होता. मात्र, रस्ताच पूर्ण झाला नसल्याने वाहनचालकांची चांगलीच कसरत होत आहे. हा रस्ता ठिकठिकाणी अपूर्ण अवस्थेत आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला साईडपट्ट्या खचलेल्या आहेत. कोंडीवडे स्मशान भूमीपर्यंत रस्ता अपूर्ण आहे. अपूर्ण असलेल्या ठिकाणी खड्डेच खड्डे पडले असून रस्त्याची चाळण झाली आहे. तर, तयार रस्त्याला रंग रंगोटी केली होती. काही ठिकाणी बोर्ड लावले होते. तेही निकृष्ट दर्जाचे होते. हे बोर्ड खाली पडले आहेत.

### पाटण ग्रामस्थांना करावी लागते कसरत

» मागील दोन ते तीन महिन्यांपासून रस्ता रूंदीकरणाच्या कामासाठी मळवली ते पाटण रस्त्याच्या कडेने जागोजागी खोदकाम केले आहे. त्यामुळे नागरिकांची अडचण झालेली असतानाच आता ऐन पावसाळ्याच्या तोंडावर रस्त्याच्या दुसऱ्या बाजूलाही नवीन पाइपलाइनच्या कामासाठी रस्त्यावर खोदकाम करण्यात आले आहे.

# पालखी मार्गाचा प्रत्येक दोनशे मीटरवर नियंत्रित आराखडा

## आयुक्त शेखर सिंह यांची माहिती, आषाढी वारीनिमित्त संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा

**पिंपरी | प्रतिनिधी**

संत तुकाराम महाराज पालखी मुक्कामाच्या ठिकाणी अर्थात आकुर्डीत कंट्रोल रुम उभारण्यात येणार आहे. तसेच, शहरातील पालखी प्रवास मार्गाचा नकाशा तयार केला जाणार असून, प्रत्येक २०० मीटर अंतराच्या नियोजनाच्या दृष्टीने नियंत्रित आराखडा तयार करण्यात येईल, अशी माहिती महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

आषाढी वारीनिमित्त संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा ३० जून रोजी आळंदी-पुणे पालखी मार्गाने शहरातील चऱ्होली फाटा, चोविसावाडी, वडमुखवाडी, मॅगझीन कॉर्नर, दिघी, बोपखेल फाटा या मार्गाने पंढरपूरकडे जाणार आहे. तर, संत तुकाराम महाराज पालखी सोहळा २९ जून रोजी आकुर्डीत मुक्कामी राहणार आहे. ३० जून रोजी खंडोबा माळ, चिंचवड स्टेशन, मोरवाडी चौक, पिंपरी चौक, खराळवाडी, वल्लभनगर, नाशिक फाटा, कासारवाडी, फुगेवाडी, दापोडी मार्गे पुण्यात पोहोचणार आहे. या पालखी सोहळा कालावधीत चार ते पाच दिवस वारकऱ्यांचा सहवास शहरात असतो. त्या अनुषंगाने महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यास अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उल्हास जगताप, सहआयुक्त चंद्रकांत इंदलकर, स्मार्ट सिटीचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी नीळकंठ पोमण, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, उपआयुक्त विठ्ठल जोशी, संदीप खोत, अण्णा बोदडे, रविकिरण घोडके, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, अग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे आदी उपस्थित होते.



### आयुक्त शेखर सिंह म्हणाले...

» - वारकऱ्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी आवश्यक सर्वसुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मुक्कामाच्या ठिकाणी रस्त्यावरील व पालखी मार्गावरील राडारोडा उचलण्याबाबत आदेश दिले आहेत. पालखी मार्गावर व कार्यक्रमांच्या ठिकाणी, मुक्कामाच्या व विसाव्याच्या ठिकाणी साफसफाई, जंतुनाशक फवारणी, महिला व पुरुषांकरिता स्वतंत्र फिरते शौचालय आदी नागरी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.पालखी मार्ग, तसेच मुक्काम आणि विसाव्याच्या ठिकाणी सॅनिटरी नॅपकीन वेंडींग व सॅनिटरी नॅपकीन बर्निंग मशीन ठेवण्यात येणार आहेत. पालखी मार्गावर वैद्यकीय पथकासह रुग्णवाहिकेची व्यवस्था असेल

### आयुक्तांच्या अधिकाऱ्यांना सूचना

» पालखी मार्गावर पावसाचे पाणी कोठेही तुंबणार नाही, याची दक्षता घ्यावी. आपत्कालीन परिस्थितीसाठी नियुक्त पथकांनी आवश्यक ठिकाणी योग्य कार्यवाही करावी. आकुर्डी येथील पालखी मुक्कामासाठी आवश्यक व्यवस्था करावी.पालखी मार्गाची वेळोवेळी पाहणी करून खड्डे बुजवावेत.पालखी मुक्कामाच्या ठिकाणी पार्कीगच्या जागी फलक लावावेत.वारकऱ्यांसाठी पुरविण्यात येणाऱ्या सुविधांसंदर्भात फलक लावावेत.पालखी मुक्कामाच्या ठिकाणी कंट्रोल रूम उभारावी.शहरातील पालखी प्रवास मार्गाचा नकाशा तयार करावा रस्त्यांचे काम चालू असल्यास त्या ठिकाणी पक्के बॅरिकेट्स उभारावेत मार्गावरील अतिक्रमणे हटवावीत.स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी

# मानाच्या प्रतिदिंडी 90 वैष्णवांनाच प्रवेश

## माऊलींच्या प्रस्थान सोहळ्याप्रसंगी प्रशासनाचा निर्णय, पालखी प्रस्थान सोहळा निर्विघ्न पार पडावा

**पुणे | प्रतिनिधी**

श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी प्रस्थान सोहळा निर्विघ्न पार पडावा, यासाठी प्रस्थान सोहळ्यासाठी मानाच्या 56 दिंडींमधील प्रत्येकी 90 वारकऱ्यांना देऊळवाड्यात प्रवेश देण्याचा प्रायोगिक निर्णय झाला आहे. प्रशासन, संस्थान कमिटी, दिंडी समाज यांच्या बैठकीत एकमुखाने यास दुजोरा देण्यात आला आहे. प्रस्थान सोहळ्यास होणारी अनावश्यक गर्दी कमी करण्यासाठीचा देखील निर्णय झाला आहे, अशी माहिती श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा प्रमुख तथा विश्वस्त योगी निरंजननाथ यांनी दिली.

यावर्षी 17 जुलै रोजी आषाढी एकादशी आहे. त्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ वद्य अष्टमीला (दि. 29 जून) तीर्थक्षेत्र आळंदी येथून श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे प्रस्थान होणार आहे. या सोहळ्याची जय्यत तयारी सुरु आहे. सोहळ्याच्या नियोजनाबाबत शुक्रवारी (दि. 7) आळंदी देवस्थानच्या भक्त निवासात बैठक झाली. प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.



> मागील वर्षी पोलिसांबाबत वारकऱ्यांमध्ये समज-गैरसमज झाले होते. सोहळा सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने वारीचे मार्गक्रमण, परंपरा जाणून घेण्याची भूमिका पोलिसांची असते. प्रत्येकाला वारीचे क्षण अनुभवायचे असतात. गेल्या तीन वर्षांपासून गर्दीवरील नियंत्रण नियोजनाबाहेर जात आहे. चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी मानाच्या 47 दिंड्या आणि नऊ उपदिंडी अशा 56 दिंड्यांतील वारकऱ्यांची संख्या मर्यादित असावी. प्रशासनातील हस्तक्षेप कमीत कमी राहण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
>
> - डॉ. शिवाजी पवार , उपायुक्त, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय

यावेळी पालखी सोहळाप्रमुख योगी निरंजननाथ, डॉ. भावार्थ देखणे, पालखी सोहळा मालक बाळासाहेब आरफळकर, पोलीस उपायुक्त डॉ. शिवाजी पवार, प्रांताधिकारी जोगेंद्र कटारे, सहायक पोलीस आयुक्त राजेंद्र गौड, राजाभाऊ चोपदार, बाळासाहेब चोपदार, दिंडी समाजचे राणू महाराज वासकर, भाऊसाहेब गोसावी, भाऊ महाराज फुरसुंगीकर, मारुती कोकाटे यांच्यासह दिंडी चालक-मालक उपस्थित होते.

महेंद्र महाजन म्हणाले की, मागील दोन वर्षांत पालखी सोहळ्याला काही कारणाने गालबोट लागले आहे. प्रशासनाच्या दृष्टीने सोहळा सुखरूप, तसेच नियंत्रणात ठेवण्यासाठी मागील वर्षी प्रस्थान सोहळ्याच्या दिवशी प्रत्येक दिंडीतील 75 वारकऱ्यांना मर्यादित प्रवेश दिला होता. देऊळवाड्यातील परिसर कमी असल्याने तेथे चेंगराचेंगरीसदृश परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी दिंड्यांमधील वारकऱ्यांना मर्यादित प्रवेश दिला होता. देऊळवाड्याच्या प्रांगणात 4250 वारकरी बसू शकतात, अशी आकडेवारी प्रशासनाने निश्चित केली होती. हा सोहळा सुरळीत पार पाडावा, यासाठी मानाच्या दिंड्यांतील वारकरी संख्या 90 करणे आवश्यक आहे.

### लाठीमाराची चौकशी करावी

» प्रशासनास सहकार्य म्हणून वारकरी तयार आहेत. मात्र, पालखी सोहळ्यात प्रशासनाचे नियंत्रण सुरू झाल्यापासून सोहळ्यात बेशिस्तपणा येऊ लागला आहे. वर्षानुवर्षे आम्ही स्वतःहून बंधन घालत आहोत. वारीत पोलिसांबरोबर जास्त लोक असतात. तसेच मागील वर्षीच्या गोंधळाची सखोल चौकशी व्हावी. त्या घटनेचा वारकरी, प्रशासनाला डाग नको. नऊ हजार लोक मंदिरात बसतात. संख्येबाबत थेट निर्णय नको. पुढील वर्षीही प्रयोग करावा. मीडियाची संख्या जास्त असते. दरवर्षी भीतीदायक वातावरण नको. अंतिम निर्णय संस्थानचा आहे, असे राणू महाराज वासकर यांनी नमूद केले.

### बैठकीतील महत्त्वाचे निर्णय

» प्रस्थान दिवशीच्या दिवशी देऊळवाड्यात मानाच्या 47 आणि 9 उप दिंडीतील प्रत्येकी 90 वारकऱ्यांना प्रवेश द्यावाप्रशासनातील कर्मचारी, पोलीसमित्र, छायाचित्रकार, मीडिया यांच्या प्रवेशावर निर्बंध आणणार वारकऱ्यांना मंदिर प्रवेश पास प्रस्थानाच्या दोन दिवस आधी चोपदार आणि संस्थानकडून देणारप्रस्थानाच्या दिवशी देऊळवाड्याच्या ओवऱ्यांमध्ये बसू दिले जाणार नाही.

---

# कृष्णा-भीमासाठी लोकसभेत आवाज उठवणार

## खासदार धैर्यशील मोहिते पाटील : संसदेत प्रथमच आल्याचा वेगळा आनंद

**पुणे | प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. 2004 मध्ये विजयसिंह मोहिते पाटलांनी कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजनेला जन्म घातला आहे. ही योजना पूर्ण करण्यासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, धाराशीव व लातुर या जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनाबरोबर घेवून आपण लोकसभेत आवाज उठवू व ही योजना पूर्ण करण्यासाठी तसेच उजनी जलाशयातील गाळ काढून या धरणाची पाणीपातळी वाढविण्यासाठी आपण प्रयत्न करू, असे आश्वासन नवनिर्वाचित खासदार धैर्यशील मोहिते पाटलांनी दिले.

खासदार मोहिते पाटील यांनी शुक्रवारी नवी दिल्ली येथील संसद भवनाला भेट देवून खासदारपदी निवडून आलेल्या प्रमाणपत्राची नोंदणी संदर्भातील कागदपत्रांची पुर्तता केली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी संसदेत प्रथमच आल्याचा वेगळा आनंद मिळाल्याचे सांगितले. ते म्हणाले की, विजयसिंह मोहिते पाटील व स्व. प्रतापसिंह मोहिते पाटील यांनी लोकसभेचे तर रणजितसिंह मोहिते पाटील यांनी राज्यसभेचे नेतृत्व केले आहे. माझ्यासाठी हा अनुभव नवीन आहे. मी ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेमध्ये काम केले असल्याने संसदेतील कामासाठी मला शरद पवार व विजयसिंह मोहिते पाटील यांचे मार्गदर्शन लाभेल, असे त्यांनी नमूद केले.



### तर कृषी मालाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध होईल

» सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघाला जोडणा-या मेंढापूर येथे 600 ते 700 एकर शासकीय जमीन आहे. या जमिनीवर कृषी प्रकल्प उभा करुन भविष्यात जर रत्नागिरी येथे माल वाहतूक बंदर उभा राहिले तर मुंबईवर येणारा वाहतुकीचा भार कमी होवून रत्नागीरी येथील बंदरावरुन शेतीमाल वाहतूक करणे सोईचे होइल व यामुळे कृषी मालाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध होइल, असे ते म्हणाले.

### राजकीय दबावला भीक घालणार नाही

» मला लोकसभेसाठी जनतेने उभे केले होते व सव्वालाखाच्या मताधिक्याने त्यांनी विजयी केले आहे. माझ्यावर या मतदारसंघातील जनतेचा विकासकामासाठी दबाव असणार आहे. माझ्यावर कोणताही राजकीय दबाव नाही किंवा त्या दबावाला भिणारा मी नाही. भाजप विरुद्ध बंड करायला मला जनतेने भाग पाडले. खासदारांविषयी नाराजी असल्याची कल्पना मी भाजपातील वरिष्ठांना दिली होती; परंतु श्रीकांत भारतीय, आमदार गोरे व आमदार शहाजी पाटील यांच्या सांगण्यावरुन भाजपाने उमेदवार बदलला नाही त्याचा परिणाम काय झाला हे निकालावरुन स्पष्ट झाले आहे.